जोडपत्र अ
पहा नियम ३

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे:

प्रति: मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी
तथा जनमाहिती अधिकारी.
मा. आरोग्य विभाग, मुख्यालय.
मिरा भाईंदर महानगरपालिका.
जि. ठाणे: ४०११०५

आवक ३९९७
दि २७/०२/२४
सार्वजनिक आरोग्य विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

अर्जदार: हनिफ धाउंड कामदार. मो. नं.: ९८२९७७८२०५७
मजहर मंझिल, कुरेशी नगर, रुम नं. २०५ अमिनाबाद
चाळी मागे चांदनगर. कौसा, मुंब्रा. जि. ठाणे. ४००६१२

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील:
अ) माहितीचा विषय: दि: २३-८-२०२३ रोजी शासन निर्णयाच्या अनुषंगाने. माहिती मिळणे बाबत.
ब) माहितीशी संबंधीत कालावधी: २३-८-२०२३ ते २७-२- ~~२०२४~~ २०२४ पर्यंत.

क) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन खालील प्रमाणे:
१) दि: २३-८-२०२३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाच्या अनुषंगाने अमलबजावणी करून मिरा भाईंदर महापालिके च्या अंतर्गत क्षेत्रामध्ये येत असलेल्या सर्व सरकारी रुग्णालय मध्ये आणि सर्व आरोग्य केंद्रा मध्ये. करण्यात येणारे सर्व उपचार व सेवा. तपासण्या नागरिकांसाठी मोफत केले जात असेल तर सविस्तर माहिती देण्यात यावी.

माहिती किती दिवसात हवी: ३० दिवसात.
माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः: व्यक्तीशः.
टपालाद्वारे असेल त्या बाबतीत: X.
माहिती ज्या साठी आवश्यक आहे ते प्रयोजन: जनहितासाठी
ठिकाण: कौसा. मुंब्रा. जि. ठाणे. ४००६१२.
दिनांक: २७-२-२०२४
सोबत: दि: २३-८-२०२३ रोजीचे महाराष्ट्र शासन निर्णयाची प्रत जोडत आहे.

H Kamdar
(अर्जदार)

Reddy Sister
२७/०२/२०२४

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन , मांडली तलाव , भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१ . दुरध्वनी क्र. ०२२-२८१९९०९३
ई मेल : moh@mbmc.gov.in

## सार्वजनिक आरोग्य विभाग



नाव :डॉ. बी.टी. दुधभाते
जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका
दुरध्वनी क्र. ०२२-२८१९९०९३

जा.क्र.मनपा/मा.अ./सार्व.आ/२८ /२०२४-२५
दि.02/04/2024

प्रति,
श्री. हनिफ दाऊद कामदार
मजहर मेन्शन, दुसरा मजला, खोली क्र.२०५, बमिनाबाद चाळी मागे,
चांदनगर कौ.सा. मुंब्रा, जिल्हा ठाणे – ४०० ६१२
भ्रमणध्वनी क्र. ८९२८४४२०३१०

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मागणी.

संदर्भ :- आपला दि.२७/०२/२०२४ रोजीचा माहिती अधिकार अर्ज.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपला दि. २७/०२/२०२४ रोजी माहिती अधिकार अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम-७ (१) अंतर्गत प्राप्त अर्जाव्दारे विभागासंदर्भात अपेक्षिलेली माहिती अभिलेखावरुन पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| मुद्दा.क्र. | माहितीचा संक्षिप्त तपशिल | माहितीचे तपशिल |
|---|---|---|
| १. | दि.२३/०८/२०२३ रोजीचे महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाच्या अनुषंगाने अमलबजावणी करुन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अंतर्गत क्षेत्रामध्ये येत असलेल्या सर्व सरकारी रुग्णालयामध्ये आणि सर्व आरोग्य केंद्रामध्ये करण्यात येणारे सर्व उपचार व सेवा तपासण्या नागरीकांसाठी मोफत केले जात असले तर सविस्तर माहिती देण्यात यावी. | १. केस पेपरचे रु. ५ (ओपीडीसाठी)<br>२. गर्भवती माता मोफत उपचार<br>३. प्रसूति / सिझेरियन मोफत<br>४. लसीकरण सुविधा मोफत<br>५. कुष्ठरोग / मलेरिया / क्षयरोग मोफत उपचार<br>६. ० ते १ वर्षे बालके मोफत उपचार<br>७. जेष्ठ नागरिक मोफत उपचार<br>८. श्वानदंश लस मोफत |

वरीलप्रमाणे माहिती उपलब्ध अभिलेखावरुन देण्यात येत असून माहितीने आपले समाधान न झाल्यास अथवा अधिक माहितीची आवश्यकता वाटल्यास कार्यालयीन वेळेत अधिकची माहिती देण्यात येईल, त्या नंतरही समाधान न झाल्यास माहिती मिळाल्यापासून ३० दिवसांत मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा अति-आयुक्त (सार्व.आ.), स्वं.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, पहिला मजला, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) यांचे कार्यालयात अपिल करता येईल.

(डॉ. बी. टी. दुधभाते)
**जनमाहिती अधिकारी तथा**
**वैद्यकिय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली शासकिय रुग्णांलयांमधील तपासणी व उपचार नि:शुल्क करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**शासन निर्णय क्रमांकः रुशुफी-२०२३/प्र.क्र.१६७/आरोग्य-३,**

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,

लोकमान्य टिळक मार्ग,मंत्रालय, मुंबई-४०० ००१.

दिनांक: २३ ऑगस्ट, २०२३.

वाचा :-

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: संकिर्ण-२०१३/प्र.क्र.४६२/भाग-२/आरोग्य-३, दिनांक- २८.१२.२०१५

२) आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- आसेआ/कक्ष-३/टे-२ /न.क्र.२३२१/ रु.शुल्क मोफत/६५६६५/२३ ,दि.१२.०६.२०२३.

३) मा.मंत्रीमंडळ निर्णय दि. ०३ ऑगस्ट, २०२३ व इतिवृत्त दिनांक १८ ऑगस्ट,२०२३.

प्रस्तावना-

आपल्या देशात कोणतीही व्यक्ती जन्माला आली की, त्या व्यक्तीला भारताच्या राज्यघटनेमध्ये देण्यात आलेले हक्क व अधिकार आपोआपच लागू होतात. आपल्या राज्यघटनेच्या मूलभूत अधिकारांमधील कलम २१ मध्ये जगण्याचा हक्क हा भारतीय नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. त्या अधिकारानुसार दर्जेदार, चांगले, निरोगी जीवन जगण्यासाठी अन्न, पाणी, निवारा यांबरोबरच आरोग्यदायी वातावरण, पुरेशा व नियमित आरोग्यसेवा यांची आवश्यकता असते.

Scanned with CamScanner

२. भारतामध्ये प्रातिनिधिक लोकशाही असल्यामुळे, भारतातल्या प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत गरजा पुरवण्याची जबाबदारी पूर्णपणे लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची आणि शासनाची आहे. त्याप्रमाणे आरोग्याच्या हक्कात निरोगी जीवन जगता येण्यासाठी आरोग्यकारक परिस्थिती उपलब्ध करणे; व आरोग्याची चांगली पातळी गाठता येण्यासाठी अनेक पातळीवर शासनाने आरोग्यसेवा व सोयी उपलब्ध करणे महत्वाचे आहे.

३. प्रत्येक भारतीय नागरिकाला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक अशा किमान आरोग्यसेवांची पूर्तता शासनाने करावी अशी माफक अपेक्षा नागरीकांची असते. राज्यातील नागरिकांना उत्तम रित्या आरोग्य सेवा देण्याकरीता आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांमध्ये संसाधने- साधनसामुग्रीची उपलब्धता, प्रशिक्षित मनुष्यबळ, औषधांची उपलब्धता, आरोग्य विषयक जनजागृती, लसीकरण, औषधोपचार असे अनेक घटक असून त्याप्रमाणे रुग्णशुल्काचा यामध्ये समावेश होत आहे. सद्य:स्थितीत आरोग्य संस्थामधील औषधे व उपचारावरील रुग्ण शुल्क नि:शुल्क केल्यास सर्व वंचित . दुर्बल घटकांना याचा मोठया प्रमाणात फायदा होणार आहे.

४. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १०.०७.२००१ च्या शासन निर्णयान्वये विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांना पुरविण्यात येत असलेल्या वैद्यकिय सेवा, तपासणी व त्याबाबतचे शुल्काचे दर निश्चित करण्यात आले होते. सदर दरामध्ये त्यावेळी अंमलबजावणी करण्यात आलेली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, सार्वजनिक व खाजगी भागीदारी तत्वावर Radiology Imaging Diagnostics Services यासारख्या योजनांचा समावेश करण्यात आलेला नाही. तसेच मोजक्याच तपासणी व शुल्क नमूद करण्यात आले होते. त्यामुळे वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दिनांक ३१.१२.२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे असलेल्या उपचार व शुल्कांच्या दराप्रमाणे आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थामध्ये वैद्यकिय सेवा, तपासणी व त्याबाबतचे शुल्क शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, दि. २८/१२/२०१५ नुसार निश्चित करण्यात आले आहे.



Scanned with CamScanner

५. राष्ट्रीय आरोग्य धोरण-२०१७ मध्ये, समाजातील सर्व घटकांसाठी उत्तरोत्तर युनिव्हर्सल हेल्थ कव्हरेज प्राप्त करणे यामध्ये मोफत व सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवांची उपलब्धता सुनिश्चित करणे तसेच आरोग्य सेवा खर्चामुळे नागरीकांच्या खर्चात लक्षणीय घट साध्य करुन परिणामी गरीबीचे निर्मूलन करणे हे उद्दिष्टय साध्य होईल. त्यामुळे समाजातील अशा तळागाळातील गरजू रुग्णांच्या दृष्टीकोनातून नि:शुल्क वैद्यकीय सेवा देणे हे शासनाचे कर्तव्य असल्याने त्याअनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत संस्थांमध्ये तपासणी शुल्क व उपचार नि:शुल्क करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

०१. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली शासकिय रुग्णांलयामधून करण्यात येणाऱ्या तपासण्या, सेवा व उपचार तसेच सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील वैद्यकिय सेवा (राष्ट्रीय रक्त धोरणानुसार रक्त व रक्त घटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणाऱ्या सेवा शुल्क वगळून) नि:शुल्क करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०२. विभागाच्या अधिपत्याखाली शासकिय रुग्णांलयामध्ये तपासणी व रुग्णशुल्क,सेवा या नि:शुल्क करण्यात आल्यामुळे संदर्भ क्र.०१ अन्वये दि.२८.१२.२०१५ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

०३. राष्ट्रीय रक्त धोरणानुसार रक्त व रक्त घटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणाऱ्या सेवा शुल्कांबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

०४. या शासन निर्णयाच्या अनुषंगाने उपचार व सेवा रुग्ण शुल्क नि:शुल्क करण्यात आल्यामुळे रुग्णालयाच्या दर्शनी भागावर / फलकावर याबाबत सूचना प्रदर्शित करण्यात यावे. तसेच सदर निर्णयास व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा यांनी कार्यवाही करावी.



Scanned with CamScanner

०५. तपासणी व उपचार सेवा नि:शुल्क केल्यानंतर रुग्णांची /जनतेची दिशाभूल /फसवणूक करुन रुग्ण शुल्क घेताना आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी. याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा यांनी कार्यपध्दती निश्चित करावी.

०६. सदर शासन निर्णय दिनांक १५ ऑगस्ट,२०२३ पासून अंमलात येत आहे. सदर शासन निर्णय मा.राज्य मंत्रिमंडळाची दि.०३ ऑगस्ट, २०२३ रोजी झालेल्या बैठकीतील विषय क्रं. ९ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०८२३१३२४२४१९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

ASHOK MAROTI ATRAM

Digitally signed by ASHOK MAROTI ATRAM
DN: CN = ASHOK MAROTI ATRAM, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = PUBLIC HEALTH DEPARTMENT
Date: 2023.08.23 13:40:44 +05'30'

**(अशोक आत्राम)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, महाराष्ट्र शासन

२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई

३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

४. सभापती ,विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.

५. अध्यक्ष विधानसभा यांचे खाजगी सचिव विधानभवन, मुंबई.



Scanned with CamScanner

६. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव,विधानभवन, मुंबई
७. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
८. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
९. महालेखापाल-१ (लेखा परिक्षा) महाराष्ट्र मुंबई
१०.महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र मुंबई
११.महालेखापाल-२ (लेखा परिक्षा) महाराष्ट्र नागपूर
१२.महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र नागपूर
१३.सिनिअर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार , वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली.
१४.अप्पर मुख्य सचिव (आरोग्य ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१५.सर्व मंत्रालयीन विभाग
१६.मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
१७. सर्व विभागीय आयुक्त
१८.सर्व जिल्हाधिकारी
१९.प्रवंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
२०. प्रवंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई
२१.सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२२.सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
२३.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२४.आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
२५.सचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२६.प्रवंधक महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई/नागपूर/ औरंगाबाद
२७.आयुक्त,आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान ,मुंबई



Scanned with CamScanner

२८.संचालक आरोग्य सेवा-१, आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन मुंबई.

२९.संचालक, आरोग्य सेवा-२, पुणे

३०.सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई.

३१.सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) मुंबई.

३२.उपसंचालक सर्व मंडळे, आरोग्य सेवा.

३३. सर्व जिल्हा शल्यचिकित्सक

३४. सर्व संबंधित आरोग्य संस्थांचे वैद्यकिय अधिक्षक

३५. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी

३६. राज्य महिला आयोग, वरळी,मुंबई.

३७.मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद.

३८.महासंचालक, यशदा, राजभवन आवार,बाणेर रोड, पुणे

३९.संचालक, लेखा व कोषागारे,मुंबई

४०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

४१.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

४२.सर्व कोषागार अधिकारी

४३.लेखाधिकारी, सर्व वेतन पडताळणी पथके, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद

४४.मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका

४५.कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहूरोड/देवळाली/अहमदनगर

४६.कुलसचिव, सर्व कृषि आणि कृषितर विद्यापीठे

४७.संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई

४८.सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद / अमरावती / नागपूर

४९.बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१



Scanned with CamScanner

५०.भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईट, मुंबई-२०

५१.भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी, ३१४,राजभुवन,एस.व्ही.पटेल रोड,मुंबई-४

५२. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३

५३.इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर ,मुंबई-२५

५४.नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईट,मुंबई-२१

५५.शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८

५६.सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय,मुंबई.

५७. निवड नस्ती, आरोग्य विभाग (आरोग्य-३)



Scanned with CamScanner